

## खेळातून शिकता येणारी कौशल्ये

- मार्गदर्शनाशिवाय खेळणे
- अडचणींतून मार्ग काढणे
- सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढते
- सर्वांशी मिळूनमिसळून वागणे
- लवचिकता आणि परिस्थितीनुसार मिळतेजुळते घेणे
- भावनिक कौशल्ये
- सामाजिक घडामोडी काळाने
- आवडीनिवडी कळणे
- वेगवेळ्या परिस्थितीत भाग घेणे

## मुलांसाठी खेळ का गरजेचा असतो?

- मुलांना खेळण्यासाठी दिलेली संधी, वेळ आणि मोकळीक यामुळे मुले जीवनावश्यक कौशल्ये शिकतात
- मुले खेळत असताना त्यांच्या आवडीनिवडी, विशेष कौशल्ये याबाबतची जाणीव तयार होते
- खेळ हे एक शिकण्यासाठीचे अप्रतिम साधन आहे ज्यामुळे त्यांना जीवनावश्यक अनुभव मिळतो



## मुलांना किती वेळ खेळू द्यावे?

- लहान मुलांना दिवसाला १ तास मोकळे, कोणत्याही बंधनांविना (फ्री प्ले) खुलू द्यावे आणि कमीतकमी अर्धा तास मोठ्यांच्या मदतीने आणि
- नियमांनुसार खेळू द्यावे
- मोठ्या मुलांना खेळण्यासाठी जास्त वेळ लागतो आणि तो त्यांना द्यावा .
- मुलांसाठी खेळणे हे एक प्रकारचे औषधच आहे.

Unnati
PEDIATRIC REHABILITATION CENTER
Building Up Milestone

# खेळ

खेळ हि एक उस्फुर्त माध्यम आहे ज्यातून मुलांना आनंद , करमणूक आणि मनोरंजन मिळते

- मजा घेणे
- यातून सर्जनशीलता, उस्फूर्तता येते
- यातून काही अभिनव कल्पनाशक्ती वाढीस लागते
- खेळातून एकाग्रता आणि मन व्यस्त राहायला चालना मिळते

# वयानुसार खेळण्याचे टप्पे



**स्वत:शी खेळणे (अनॉक्युपाइड प्ले) ३ महिन्यांपर्यंत -**
बाळ स्वत:च्या शरीराची ओळख करून घेण्यासाठी हात, पाय तोंडाशी खेळात असते



**एकटे खेळणे (सॉलिटेरी प्ले) २ वर्षांपर्यंत**
आजूबाजूला मुले असतानाही बाळ स्वत: एकटे खेळत असते



**दुसऱ्यांना खेळताना बघणे (ओंनलूकर प्ले)– २ वर्षे**
मूल दुसऱ्या मुलांना खेळताना बघत असते पण त्यांच्याशी खेळत नाही



**समांतर खेळणे(पॅरालल प्ले) २– ३ वर्ष**
दुसरी मुले खेळात असताना त्यांच्याशी न खेळात त्यांच्या बाजूला बसून आणि त्यांचे बघून खेळते



**संघटीत खेळणे (असोसिएटिव्ह प्ले) ३ ते ४ वर्ष**
स्वत: दुसऱ्यांचे बघून खेळत असताना त्यांचा खेळ समजल्यावर त्यांच्यासोबत जाऊन खेळणे



**सहकार्याने खेळणे (को ऑपेरेटीव्ह प्ले) ४ वर्ष आणि पुढे**
दुसरी मुले खेळात असताना त्यांच्यात आणि खेळण्यातही आवड असणे आणि त्यामुळे त्यांच्यासोबत , त्यांच्या कलाने, नियमांनुसार खेळणे

## मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खेळाची मदत घ्या
## जन्मापासून बाळ हे सभोवताल समजून घेण्याचा प्रयत्न करत असते



### ० ते ६ महिने

- बाळांना विविध रंगांची आणि प्रकाशाची खेळणी दाखवा
- बाळाशी सतत बोलता राहा जेणेकरून ते तुमचा आवाज ओळखेल आणि तुम्हाला प्रतिसाद देईल
- बाळाला सभोवताल वेगवेगळ्या दिशांनी बघायला मिळेल अशा पद्धतीने त्याला बसावा
- बाळाला त्याच्या आवडीची खेळणी चेहऱ्यापाशी आणू द्या
- मजेशीर आणि वेगवेगळे चेहरे करून त्याच्याशी बोला जेणेकरुन ते तुमची नक्कल करेल
- त्याला पालथा पडायची आवड लागावी म्हणून आरसा किंवा त्याच्या आवडीची खेळणी वापर



### ७ ते १२ महिने

- डोकावण्याचा खेळ(पीक ए बु) खेळ
- बाळाला आरशात त्याचे प्रतिबिंब दाखवा
- बाळाला रांगण्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करा
- बाळाला पालथे, एका कुशीवर ई. प्रकारे ठेवा
- क्रियेला प्रतिक्रिया हा नियम त्यांना जामजावून सांगायला मदत करा. जसे वाजणारे खेळणे दाबले किंवा हलवले तर त्यातून गाणे ऐकू येईल
- वयानुसार त्यांना खेळणी आणून द्या



### १ ते ३ वर्ष

- मुलांना त्यांच्या आवडीचा खेळ खेळू द्या
- मुलांना रंगीत खडू किंवा पेन ज्यामुळे ते कागदावर काही तरी लिहायचा प्रयत्न करेल
- समवयस्क मुलांसोबत खेळायला लावा
- विविध हालचालींतून किंवा खेळातून मुलांना शारीरिक ज्ञान मिळेल असे खेळ खेळू द्या
- काल्पनिक खेळ खेळायला मदत करा मुलांनी विचारलेल्या प्रश्नांना आपुलकीने प्रतिसाद द्या आणि त्यांचा बोलण्यासाठीचा सहभाग वाढवा



### ४ ते ६ वर्ष

- मुलाला गाणे, नाचू देणे
- तुम्ही त्याला एखादी गोष्ट सांगू त्याला नंतर तीच गोष्ट परत आठवायला सांगा
- काल्पनिक खेळ, त्यातील भूमिका आणि दृश्यांच्या साहाय्याने खेळण्यास प्रोत्साहित करा
- काल्पनिक ते वास्तविक खेळांमधील फरक समजावून सांगा
- सामाजिक बांधिलकी आणि मैत्री निर्माण व्हावी यासाठीच्या वेळा आखून पालन करा

## खेळण्यासाठी च्या काही टिप्स

- फोन किंवा टीवी जास्त वेळ बघू देऊ नका
- मैदानी खेळ खेळायला प्रोत्साहन द्या
- मुलांना चुका करू द्या
- काल्पनिक खेळ खेळू द्यायला प्रोत्साहन द्या
- आव्हानात्मक खेळांची ओळख करून द्या